नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 27/04/2021 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

### पो.स्टे भिवापुर येथे अवैधरित्या रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक
### एकुण 1,05,95,000 रुपयाचा मुद्देमाल जप्त
### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

दिनांक 27.04.2021 रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक पोलीस स्टेशन भिवापुर अंतर्गत पेट्रोलींग करीत असता पोलीस मित्राद्वारे खात्रीशिर बातमी मिळाली की, पोस्टे भिवापुर हद्दीतुन काही इसम अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करीत आहे. या खबरेवरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने दि. 27.04. 2021 चे 06.15 वा. ते 07.00 वा. सुमारास तहसिल कार्यालय फाटा टी पाईंट भिवापुर येथे नाकाबंदी करून पवनी येथुन भिवापुर मार्गे उमरेड कडे जाणारे 1) एमच–40/सीडी–6475 क्रमांकाच्या ट्रक, 2) एमच–40/डीएल–3896 क्रमांकाच्या ट्रक व 3) विना क्रमांकाच्या ट्रकचा चालकांना थांबवून तपासले असता सदर वाहनात चालक आरोपी क्र– 1) दिनेश विलास बिलवने, वय 24 वर्ष, रा. भंडारा, 2) गौतम तुलाराम राजक, वय 40 वर्ष, रा. ग्वालियर मध्यप्रदेश व 3) दुशन्त संप्तलाल सलामे, वय 32 वर्ष, रा. पाचगाव यांनी त्यांच्या ताब्यातील वाहनात विना परवाना अवैधरित्या एकुण 19 ब्रास रेती किं. 95,000/– रू. भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण 1,05,95,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस हवा रमेश भोयर स्थानिक गुन्हे शाखा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून पुढील कार्यवाही करीता आरोपी व मुद्देमाल पोस्टे भिवापुर यांचे ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार रमेश भोयर, संतोष पंढरे, मदन आसतकर, पोलीस शिपाई राधेश्याम कांबडे, बालाजी साखरे, चालक पोहवा भाउराव खंडाते यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर